महिला व बाल विकास विभागांतर्गत, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या तरतूदीअन्वये मान्यता असलेल्या स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित बालगृहांच्या सहायक अनुदानात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र. बालगृ- २०१८/प्र.क्र.१६/का-८,

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१८.

वाचा:

१. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग संकीर्ण-२०११/प्र.क्र.४१८/का-८ दि. १३.९.२०१३
२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग विभशा-२०१०/ प्र.क्र.६/ विजाभाज-२ दि. ०१.०३. २०१६.
३. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल सुमोटो जनहित याचिका क्र.१८२/२०१० मध्ये दि. ०७.०४.२०१७ रोजीचे निर्देश.
४. शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग बालगृ-२०१५/प्र.क्र.५०/का-८ दि. २७.१०.२०१७
५. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग इडीडी-२०१७/प्र.क्र.२५०/अ.क.१ दि. ०१.११.२०१७.

प्रस्तावना :

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील तरतुदीनुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या पुनर्वसन व पुनर्स्थापनेच्या उद्देशाने निवासी व इतर अत्यावश्यक सेवासुविधा पुरविण्यासाठी स्वयंसेवी संस्थाना बालगृह चालविण्यास शासनाची मान्यता देण्यात येते.

२. शासन निर्णय दि. १३.९.२०१३ अन्वये स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित सर्वसाधारण बालगृहांना प्रति प्रवेशित दरमहा दरडोई रू. ९००/- इतके परिरक्षण (परिपोषण) अनुदान आणि वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार व इतर प्रशासकीय खर्चासाठी रू. ३१५/- इतके असे एकूण रू. १२१५/- इतके सहायक अनुदान देण्यात येते. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणारे परिरक्षण (परिपोषण) अनुदान वाढवून देण्यासंदर्भात शिफारस करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०१.०३.२०१६ च्या शासन निर्णयाअन्वये अभ्यास गटाची नेमणूक करण्यात आली आहे.

३. मतिमंद बालगृहांबाबत मुंबई उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र. १८२/२०१० (मुंबई मिरर वि.महाराष्ट्र शासन) दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेवर मा. मुंबई उच्च न्यायालयाने परिपोषण अनुदान सुधारणेबाबत शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत सर्वसाधारण बालगृहांना प्रति माह प्रति प्रवेशित रू. १५००/- इतके परिरक्षण (परिपोषण) अनुदान आणि इतर खर्चासाठी प्रति माह प्रति प्रवेशित रू. ५००/- इतके सहायक अनुदान देण्याबाबत दि. ०७.०४.२०१७ रोजी आदेश दिले आहेत.

४. महिला व बाल विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या एकूण ९८४ अनुदानित सर्वसाधारण बालगृहांना मान्यता असून सदर बालगृहांची मंजूर प्रवेशित क्षमता ८२२८४ इतकी आहे. मात्र शासनाने जुलै, २०१५ मध्ये अनुदानित बालगृहांची त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी केली असून त्यानुसार सदर बालगृहांची अ, ब व क आणि क व्यतिरिक्तत याप्रमाणे वर्गवारी केली आहे. तपासणीअंती दि. २७.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुदानित मान्यता असलेल्या एकूण २१३ संस्थांची मान्यता आणि नोंदणी प्रमाणपत्र शासनाने रद्द केले असून या संस्थांना सन २०१७-१८ या वर्षाचे सहायक अनुदान देय असणार नाही याप्रमाणे निर्णय घेतला आहे.

५. उपरोक्त पार्श्वभूमीवर मा.मुंबई उच्च न्यायालयाने आदेशित केल्यानुसार, स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या अनुदानित सर्वसाधारण बालगृहांतील प्रवेशितांना, परिपोषण अनुदान सुधारित करण्यासंदर्भात गठित करण्यात आलेल्या समितीचा निर्णय होईपर्यंत, दि. ०१.०४.२०१७ पासून सुधारित अनुदान लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती:-

शासन निर्णय :-

१. आता या शासन निर्णयान्वये स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित संस्थांमधील प्रवेशितांना देण्यात येणारे परिपोषण अनुदान वाढवून देण्यासंदर्भात शिफारस करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठित अभ्यास गटाचा निर्णय होईपर्यंत सर्वसाधारण बालगृहांना दि. १.४.२०१७ पासून प्रति माह प्रति प्रवेशित रू. १५००/- इतके परिरक्षण (परिपोषण) अनुदान आणि वेतन, आकस्मिक खर्च, इमारत भाडे, वीज, पाणी आकार व इतर प्रशासकीय खर्चासाठी प्रति माह प्रति प्रवेशित रू. ५००/- इतके सहायक अनुदान याप्रमाणे एकूण प्रति माह प्रति प्रवेशित रू. २०००/- याप्रमाणे अनुदान लागू करण्यात येत आहे. परिरक्षण (परिपोषण) अनुदानाची रक्कम केवळ प्रवेशितांच्या अन्न,वस्त्र, व इतर गरजा भागविण्यासाठी वापरण्यात यावी, या परिरक्षण (परिपोषण) अनुदानातून कोणत्याही संस्थांनी कर्मचा-यांच्या वेतनावर अथवा प्रशासकीय बाबींवर खर्च करू नये.

२. सदरचे अनुदान संस्थांना देय होण्यासाठी शासन निर्णय दि. १३.९.२०१३ मध्ये विहीत करण्यात आल्या नुसार बालगृहात बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वित असणे आणि केंद्रशासनाच्या Track Child या संकेतस्थळावर बालगृहांची माहिती भरणे या अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाच्या तरतूदींच्या अनुषंगाने, बालकांस बालगृहात प्रवेश देणेबाबत निर्णय घेताना,संबंधित बालकास कुटुंबात राहण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि अनाथ, निराधार अशा आत्यंतिक गरजू प्रवेशितांनाच बालगृहात दाखल करण्यात यावे.

४. सदर प्रयोजनासाठीचा खर्च २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाज कल्याण, १०२, बाल कल्याण, (०५) निराश्रित बालकासाठी संस्थेत्तर सेवा, (२२३५ ११४७), ३१ सहायक अनुदान, (वेतनेत्तर) कार्यक्रमांतर्गत व (०२) (०३) संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणा-या स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (अनिवार्य), (२२३५ ३०४१), ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) याच्या चालू आर्थिक वर्षाच्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

५. शासन निर्णय दि. २७.१०.२०१७ अन्वये मान्यता रद्द करण्यात आलेल्या बालगृहांना सदरचे अनुदान देय असणार नाही.

६. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २८/१४७२ दि. ०२.०३.२०१८ आणि व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ३६/२०१८, व्यय-६ दि. ५.२.२०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०२२७१७१७४९३८३० असा आहे. सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.02.27 17:19:19 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ,मुंबई.
६) मा.मंत्री (म व बा वि)/राज्यमंत्री ((म व बा वि),यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव, मंत्रालय,मुंबई.
८) प्रधान सचिव, नियोजन विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
९) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव (ले व का), वित्त विभाग,मंत्रालय ,मुंबई.
११) सचिव, विजाभज, विमाव व इमाव कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.
१५) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
१६) वित्त विभाग (व्यय-६), (अर्थसंकल्प-७), नियोजन विभाग (का.१४७२) मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.
१७) सर्व कार्यासने महिला व बाल विकास विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई.
१८) निवड नस्ती/का-८.